महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

https://jeevandeepvarta.com

मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

बुधवार ■ 05 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 221 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024


## थोडक्यात महत्वाचे

### २६,५०२ घरांसाठी २२ हजार अर्ज

## यंदा सर्वांनाच सिडकोची लॉटरी लागणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मोठा गाजावाजा करत सिडकोकडून महिन्याभरापूर्वी नवी मुंबईतल्या तब्बल २६ हजार ५०२ घरांची घोषणा करण्यात आली. पण गरीब व अल्प उत्पन्न गटातील नागरिकांसाठी ही 'परवडणारी' घरं 'महागच' ठरल्याचं चित्र निर्माण झालं आहे. अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देऊनही या घरांसाठी अवघे २२ हजार अर्ज दाखल झाल्याचं स्पष्ट झालं आहे. आता तिसऱ्यांदा मुदतवाढ न देता पुढील कार्यक्रमच जाहीर केला आहे. त्यामुळे सिडकोच्या या घरांसाठी अर्ज दाखल केलेल्या सर्वांनाच लॉटरी लागणार असल्याचं स्पष्ट झालं आहे.

CIDCO अर्थात सिटी अँड इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्राच्या 'माझे पसंतीचे घर' योजनेत तब्बल २६ हजार ५०२ घरं उपलब्ध करून देण्यात आली. वाशी, तळोजा, खारघर, खांदेश्वर, पनवेल आणि उलवे या भागात ही घरं देण्यात आली. ही घरं रेल्वे स्थानक आणि नजीकच्या व्यावसायिक केंद्रांच्या जवळ आहेत. मात्र, तरीदेखील या घरासाठी अर्ज करण्यासाठी नागरिकांमध्ये अनुत्सुकता पाहायला मिळाली. त्याचाच परिणाम म्हणून एवढ्या मोठ्या संख्येनं असणाऱ्या घरांसाठी अवघे २२ हजार अर्ज आले आहेत.

## ठाण्यातील क्रिकेट सामन्यात राडा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : कोपरी येथे सिद्धेश अभंगे फाऊंडेशन या संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या क्रिकेट सामन्यात आयोजक आणि संघामध्ये तुफान राडा झाल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी आयोजक सिद्धेश अभंगे याच्यासह इतर सहा ते सात जणांविरोधात क्रिकेट संघातील खेळाडूंनी तक्रार दाखल केली. सिद्धेश अभंगे याच्या समाजमाध्यमांवरील खात्यावर तो शिवसेनेच्या (शिंदे गट) युवासेनेचा पदाधिकारी असल्याचे नमूद आहे. आयोजकांमार्फतही संघाच्या काही खेळाडूंविरोधात तक्रार दाखल केली. त्यानुसार कोपरी पोलीस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल झाले आहेत.

कोपरी येथील मैदानात २ ते ५ फेब्रुवारी या दरम्यान सिद्धेश अभंगे फाऊंडेशन तर्फे क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सामान्यावेळी क्रिकेट संघातील काही खेळाडूंचे आयोजकांनी दिलेल्या निर्णयावरून वाद झाले. या वादाचे पर्यवसन हाणामारीत झाले. दरम्यान, घटनेची माहिती कोपरी पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी आयोजक आणि खेळाडूंना ताब्यात घेतले. याप्रकरणी दोन्ही गटाविरोधात धक्काबुक्की केल्याप्रकरणी परस्पर गुन्हे दाखल झाले आहेत. सिद्धेश अभंगे याच्या समाजमाध्यमावरील खात्यावर तो शिंदे गटाच्या युवासेनेचा पदाधिकारी असल्याचा उल्लेख आहे.

### वसई विरार महापालिकेकडून

## चार इमारती जमीनदोस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वसई- अग्रवाल नगरी येथील ४१ इमारतींवरील कारवाईला वेग आला आहे. सोमवारी वसई विरार महापालिकेने अतिरिक्त यंत्रसामुग्रीचा वापर करून एकाच दिवसात ४ इमारत जमीनदोस्त केल्या. या कारवाईत आतापर्यंत १४ इमारती पाडण्यात आल्या आहेत.

नालासोपारा पूर्वेच्या अग्रवाल नगरी येथील आरक्षित जागेवर उभ्या असलेल्या ४१ इमारती महापालिकेतर्फे निष्काषित करण्यात येत आहे. मात्र आतापर्यंत ही कारवाई संथ सुरू होती. नोव्हेंबर महिन्यात ७ धोकादायक इमारती पाडण्यात आल्या होत्या. जानेवारी महिन्यात केलेल्या कारवाईत केवळ ४ इमारती तोडण्यात आल्या होत्या. रहिवाशांचा विरोध, त्यांना घरातून बाहेर काढण्यासाठी लागणारा वेळ यामुळे कारवाईला विलंब होत होता त्यामुळे जानेवारी अखेरपर्यंत केवळ १२ इमारती पाडण्यात आल्या होत्या. ही कारवाई संथ गतीने सुरू असल्याने पालिकेवर टिका होऊ लागली होती. अखेर पालिकेने सोमवार पासून जोरात कारवाई सुरू केली.सोमवारी पालिकेने नियोजन करून इमारती पाडण्यास सुरवात केली. एकाचे वेळी दोन पोकलेन आणि जेसीबीच्या सहाय्याने इमारती पाडण्यात आल्या. त्यामुळे सोमवार संध्याकाळ पर्यंत ४ इमारती जमीनदोस्त झाल्या होत्या. आतापर्यंतच्या एकूण कारवाईत १६ इमारती पाडण्यात आल्या आहेत.





### मुरबाड मतदार संघात

# एक लाख विद्यार्थ्यांचा सूर्यनमस्कार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापुरात एकाच वेळी एक लाख विद्यार्थ्यांचा सूर्यनमस्कार117 महाविद्यालय 250 शाळा, 500 शिक्षकांचा सहभागरथसप्तमीनिमित्त विशेष उपक्रमAnchor - रथसप्तमीचं औचित्य साधून बदलापूर, मुरबाडमध्ये तब्बल 1 लाख विद्यार्थ्यांनी एकाच वेळी सूर्यनमस्कार करत एक नवा विक्रम केलाय. आमदार किसन कथोरे यांच्या संकल्पनेतून बदलापूर मुरबाड मतदार संघातील 117 महाविद्यालय आणि 250 शाळांमध्ये हा उपक्रम राबवण्यात आला. 500 योगा शिक्षकांनी प्रत्यक्ष आणि ऑनलाइन उपस्थित राहून या विद्यार्थ्यांना सूर्यनमस्काराचं मार्गदर्शन केलं.उत्तम आरोग्यासाठी सूर्यनमस्काराला अतिशय महत्त्व आहे. म्हणूनच रथसप्तमीचं औचित्य साधून बदलापूर, मुरबाड आणि कल्याण ग्रामीणमधील विविध शाळा आणि महाविद्यालयांमध्ये एकाच वेळी एक लाख सूर्यनमस्कार या उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या उपक्रमात आदर्श महाविद्यालय, बदलापूर हायस्कूल, कारमेल हायस्कूल अशा सर्वच शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येनं सहभाग घेतला होता.

यातून विद्यार्थ्यांमध्ये योगाबद्दल आवड निर्माण होईल आणि त्यांचं आरोग्य सुदृढ राहील असा विश्वास या निमित्ताने आमदार किसन कथोरे यांनी व्यक्त केलाय.




## मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प सादर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई महानगरपालिकेचा २०२५-२६ या आर्थिक वर्षातील ७४४२७.४१ कोटी रूपयांचा अर्थसंकल्प अतिरिक्त महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी मंगळवार, ४ फेब्रुवारी रोजी महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे सादर केला. चालू आर्थिक वर्षाच्या तुलनेत आगामी अर्थसंकल्पाचे आकारमान ९२४६.६२ कोटी रुपयांनी अधिक असून आगामी अर्थसंकल्प १४.१९ टक्क्यांनी अधिक आहे. विविध विकास कामांसाठी ४३१६५.२३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. म्हाडाच्या कोकण मंडळाच्या २२६४ घरांसाठी उद्या सोडत, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ठाण्यात सोडतीचा कार्यक्रम चालू आर्थिक वर्षात सुशोभिकरण, रस्त्यांचे सुरू असलेले कॉंक्रीटीकरण, त्याचबरोबर हाती घेतलेल्या मोठ्या प्रकल्पांसाठी महापालिकेला मोठा निधी खर्च करावा लागला आहे. महापालिकेच्या ठेवी त्यासाठी मोडाव्या लागल्या होत्या. ही बाब लक्षात घेऊन महसूलवृद्धीवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.

## शिळफाटा वाहतूक नियोजनासाठी दीडशे कर्मचारी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण शिळफाटा रस्त्यावरील निळजे रेल्वे उड्डाण पुलाच्या पुनर्बांधणीचे काम समर्पित जलदगती रेल्वे मालवाहू विभागाकडून ५ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत केले जाणार आहे. या कामासाठी शिळफाटा रस्त्यावरील पलावा चौकाकडे येणारी सर्व प्रकारची वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. या कालावधीत शिळफाट्यासह पर्यायी रस्ते मार्गांवर वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी १५० हून अधिक वाहतूक पोलीस, वाहतूक सेवक विविध रस्त्यांवर चक्राकार पध्दतीने २४ तास तैनात असणार आहेत, अशी माहिती कोळसेवाडी वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन सांडभोर यांनी दिली. शिळफाटा रस्त्यावरील पलावा चौक परिसर वाहतुकीसाठी बंद राहणार आहे. या कालावधीत वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी वाहतूक विभागाचे वरिष्ठ, मेट्रो, डीएफसीसी विभागाचे अधिकारी यांची एक बैठक लोढा पलावा येथील एका शाळेच्या सभागृहात सोमवारी घेण्यात आली. या बैठकीत शिळफाटा रस्ता बंदचा प्रवाशांना त्रास होऊ नये, पर्यायी रस्ते मार्गावरील वाहतूक नियोजन विषयावर चर्चा करण्यात आली. वाहतूक बंदीचा कोणाही प्रवाशाला वाहतूक कोंडीच्या माध्यमातून त्रास होऊ नये म्हणून शिळफाटा रस्त्यासह संलग्न पर्यायी आठ ते दहा रस्त्यांवर वाहतूक पोलीस, अधिकारी पाच दिवस तैनात असणार आहेत.

## शहापुरात आदिवासी महिलांच्या नावाने कर्ज घेऊन फसवणूक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : आदिवासी-कातकरी समाजातील महिलांचे तात्पुरते बचतगट स्थापन करून त्या महिलांच्या नावावर बँक आणि पतपुरवठा संस्थेमधून कर्ज काढून त्यांची फसवणुक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. कर्जाची रक्कम मिळालेली नसतानाही वसुली एजंटचा त्रास सुरू झाल्याने आदिवासी महिला हैराण झाल्या आहेत. या प्रकरणी किन्हवली पोलिसांनी एका दाम्पत्याला अटक केली असून अशाप्रकारे शहापुर तालुक्यातील अनेक महिलांची फसवणूक झाली आहे.

शेणवा येथील सविता गणेश वाघ यांनी दिलेल्या तक्रारीवरून किन्हवली पोलिसांनी गुन्हा दाखल करून याप्रकरणा दत्तात्रेय सिताराम रण आणि त्याची पत्नी गुलाब दत्तात्रेय रण या दाम्पत्याला अटक केली आहे. याप्रकरणात बँकेचे कर्मचाऱ्यांचाही सहभाग आहे का, या दिशेने तपास करण्यात येत आहे. शहापूर तालुक्यातील ठिकठिकाणच्या कातकरीवाडीतील गरीब गरजू आदिवासी महिलांना एका कर्ज प्रकरणी चार ते पाच हजार देऊन त्यांच्या नावावर विविध बँक आणि पतपुरवठा करणाऱ्या संस्थांमधून कर्ज काढण्यासाठी त्यांची कागदपत्रे जमा करण्यात आली. या महिलांच्या अशिक्षीतपणाचा गैरफायदा घेवून त्यांचे तात्पुरते बचत गट स्थापन केले आणि या महिलांच्या नावावर विविध बँक तसेच पतपुरवठा संस्थांमधून ३० ते ७० हजारापर्यंत असे लाखो रुपयांचे कर्ज काढले. महिलांना मिळालेल्या कर्जाची सर्व रक्कम दलाल टोळीने महिलांकडून जमा केली आणि या कर्जाची फेड आम्ही करू असे सर्व महिलांना आश्वासन दिले. कर्जाचे पहिले हप्ते भरले. मात्र दुसऱ्याच महिन्यात हप्ते भरले नाहीत आणि स्वतःचे दूरध्वनी बंद करून उडवाउडवीची उत्तरे देणे सुरू केले. एकीकडे कर्ज देणाऱ्या बँका आणि पतपुरवठा संस्थांच्या वसुली एजंटांचा त्रास तर दुसरीकडे या टोळीची अरेरावी अशा दुहेरी संकटात अडकलेल्या काही आदिवासी महिला भयभीत झाल्या आहेत.

## मंत्रिमंडळ बैठकीत तीन महत्वाचे निर्णय

### पुणे सातारा जिल्ह्याला थेट लाभ, अभय योजनेसही मुदतवाढ



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज पार पडली. या बैठकीत तीन विभागाच्या संदर्भाने महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामध्ये, महसूल, जलसंपदा आणि मृदू व जलसंधारण विभागातील महत्त्वाच्या निर्णयाचा समावेश आहे. पुणे(Pune), सातारा जिल्ह्यासंदर्भाने हे दोन निर्णय घेण्यात आले असून अभय योजनेला एक वर्ष मुदतवाढ देण्याचा हा निर्णय राज्यभरतील नागरिकांना दिलासा देणारा आहे. राज्यात महायुती सरकार स्थापन झाल्यापासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ बैठक होत आहेत. मात्र, अद्याप कुठल्याही बैठकीत काही मोठे निर्णय घेण्यात आल्याचं दिसून आलं नाही. आजच्या बैठकीतही केवळ 3 निर्णय घेण्यात आले आहेत.

पुणे जिल्ह्यातील टेमघर प्रकल्पाच्या (ता. मुळशी) गळती प्रतिबंधक उपाययोजनेची उर्वरित कामे व धरण मजबुतीकरणाच्या कामांसाठी 315 कोटी 5 लाख रूपयांच्या खर्चास विशेष बाब म्हणून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. राज्य सरकारच्या जलसंपदा विभागाकडून हा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर व जावळी तालुक्यातील कोयना जलाशयामध्ये बुडीत बंधारे बांधण्याच्या 25 प्रकल्पांसाठी 170 कोटी रूपयांच्या तरतूदीस विशेष बाब म्हणून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाअंतर्गत हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्याच्या महसूल विभागांतर्गत शेती, अकृषिक, निवासी, वाणिज्यिक अथवा औद्योगिक प्रयोजनासाठी तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थांना भाडेपट्टयाने किंवा कब्जेहक्काने दिलेल्या शासकीय भोगवटादार वर्ग-2 च्या जमिनी भोगवटादार वर्ग-1 मध्ये रुपांतरीत करताना कमी अधिमूल्य आकारण्याच्या अभय योजनेस एक वर्षांची मुदत वाढ देण्यात आली आहे.

### प्रशासनाच्या दुर्लक्षाने नवीमुंबई

## बाजार समितीत अनधिकृत बांधकामे !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीतील धान्य बाजारातील डब्ल्यू विंगमध्ये दुरुस्तीच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम सुरू आहे. एकूण २५ हजार चौरस फुटाचे हे अनधिकृत बांधकाम आहे. यावर नवी मुंबई महापालिका अतिक्रमण विभागाने कारवाई केली होती. मात्र त्याठिकाणी आता पुन्हा जोमाने नवीन बांधकाम सुरू आहे. त्यामुळे या कामाला प्रशासनाचे अभय आहे का, असे प्रश्न उपस्थित होत आहे.

> मुंबई कृषी उत्पन्न धान्य बाजारातील डब्ल्यू विंग मध्ये अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात आली होती. त्यांनी काम थांबवल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता. मात्र पुन्हा आता काम सुरू असेल तर चौकशी करू.
>
> – प्रबोधन मवाडे, तुर्भे विभाग अधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका

एपीएमसी धान्य बाजारातील डब्ल्यू विंगमधे २५ हजार चौरस फुट जागेवर दुरुस्तीच्या नावाखाली तोडफोड करून बेकायदेशीर बांधकाम सुरू आहे. जवळपास २५ हजार चौरस फुटाचे असलेल्या ८० गाळयाची तोडफोड करून एकत्रीकरण करणाचे काम सुरू आहे. एपीएमसी संचालक मंडळाची कोणतीही परवानगी न घेता ७०-८० कार्यालयांची ब्रेकरच्या साह्याने तोडफोड व एकत्रीकरण करून अनधिकृत बांधकाम केले जात होते. धान्य बाजारातील डब्ल्यू विंगमधे व्यापाऱ्यासाठी असलेली जवळपास ८० कार्यालय एका खासगी संस्थेला देण्यात आली आहे. हे बांधकाम करण्यासाठी महापालकेची कोणतीहीप परवानगी घेण्यात आली नव्हती. नवी मुंबई महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने कारवाई केल्यानंतर हे काम थांबवण्यात आले होते. तसेच संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये देखील हा विषय चर्चेसाठी घेण्यात आला होता. त्यानंतर संचालक मंडळाने देखील येथील सुरू असलेल्या कामाचा पाहणी दौरा केला होता. तसेच यावेळी माजी आमदार शशिकांत शिंदे यांनी देखील आक्षेप घेतला होता. मात्र तरी देखील या ठिकाणी पुन्हा जोमाने काम सुरू असल्याचे निदर्शनास येत आहे.



## गायरान जमिनींवरील अतिक्रमणे हटवा - हायकोर्टाचे आदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : गायरान जमिनींवर झालेली अतिक्रमणे येत्या चार महिन्यांत हटविण्यात यावीत, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. या अतिक्रमणांविरोधात उच्च न्यायालयाने कठोर भूमिका घेतली आहे. गायरान जमिनींचे संरक्षण गरजेचे आहे. या सरकारी जमिनींवर अतिक्रमण करण्याचा कोणालाही अधिकार नाही, असे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या खंडपीठाने स्पष्ट करून नाशिक जिल्ह्याच्या येवला तालुक्यातील डोंगरगाव येथील गायरान जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याचे आदेश राज्य सरकारला दिले भादेत ही कारवाई ग्रामपंचायतीच्या माध्यामातन पर्ण करावी असेही खंडपीठाने बजावले साहे गायरान जमिनींवरील अतिक्रमणांकडे लक्ष वेधत डोंगरगाव येथील ग्रामस्थांनी ॲड. एकनाथ ढोकळे यांच्यामार्फत जनहित याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या खंपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी खंडपीठाने अतिक्रमणांचा प्रश्न गंभीर असल्याचे नमूद करून त्यावर कारवाई करण्यासाठी राज्य सरकारला चार महिन्यांची मुदत दिली. त्यावर सरकारी वकिलांनी अतिक्रमणे हटवण्यासाठी योग्य ती कारवाई सुरू असून ती निर्धारित वेळेत हटवली जातील, अशी हमी दिली. यावेळी याचिकेला विरोध करीत ग्रामपंचायतीच्या वतीने डोंगरगावच्या ग्रामसेवकांनी प्रतिज्ञापत्र दाखल केले. मात्र, न्यायलयाने त्यावर कोणतेही भाष्य केले नाही. कोणालाही सरकारी जमिनीवर अतिक्रमण करण्याचा अधिकार नाही, असे बजावत खंडपीठाने अतिक्रमणांवर चार महिन्यांत कारवाई करण्याचे सक्त आदेश दिले.

# गीतासार



अथ चेत्त्वमिमं धर्म्यं
संग्रामं न करिष्यसि ।
ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा
पापमवाप्स्यसि ॥२- ३३॥

परंतु जर तू हे धर्मयुक्त युद्ध केले नाहीस तर स्वधर्म आणि कीर्ती गमावून पापाला जवळ करशील. ॥ २-३३ ॥

अकीर्तिं चापि भूतानि
कथयिष्यन्ति तेऽव्ययाम् ।
सम्भावितस्य
चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते
॥२- ३४॥

तसेच सर्व लोक तुझी चिरकाळ अपकीर्ति सांगत राहातील. आणि सन्माननीय पुरुषाला अपकीर्ती मरणाहून दुःसह वाटते. ॥ २-३४ ॥

भयाद्रणादुपरतं मंस्यन्ते
त्वां महारथाः ।
येषां च त्वं बहुमतो भूत्वा
यास्यसि लाघवम् ॥२- ३५॥

शिवाय ज्यांच्या दृष्टीने तू आधी अतिशय आदरणीय होतास, त्यांच्या दृष्टीने आता तुच्छ ठरशील. ते महारथी लोक तू भिऊन युद्धातून काढता पाय घेतला, असे मानतील. ॥ २-३५ ॥

अवाच्यवादांश्च
बहून्वदिष्यन्ति तवाहिताः ।
निन्दन्तस्तव सामर्थ्यं ततो
दुःखतरं नु किम् ॥२- ३६॥

तुझे शत्रू तुझ्या सामर्थ्याची निंदा करीत तुला पुष्कळसे नको नको ते बोलतील. याहून अधिक दुःखदायक काय असणार आहे? ॥ २-३६ ॥

## आरोग्य टिप्स

# आंबे हळदीचे लोणचं



**साहित्य:**

आंबे हळद: १ कप (किसलेली),हळद पावडर: १ चमचा,मोहरी पावडर: १ चमचा,मेथी पावडर :१/२ चमचा,हिंग: १/४ चमचा,लाल तिखट: २ चमचे (आवडीप्रमाणे कमी-जास्त करा),मीठ: चवीनुसार,लिंबाचा रस: २-३ मोठे चमचे,तेल: १/२ कप (गोडेतेल किंवा मोहरी तेल),काळी मोहरी: १ चमचा,हिंग: चिमूटभर,कढीपत्ता: १०-१२ पाने

**कृती:**

हळद आणि मसाले तयार करा: आंबे हळदीच्या लोणच्याचा मसाला कसा बनवायचा?

प्रथम आंबे हळद स्वच्छ धुवून घ्या, हळदीला पुसून घेतल्यानंतर ती किसून घ्यावी आणि त्यानंतर बाजूला ठेवावी. लोणच्याचा मसाला तयार करण्यासाठी एका पॅनमध्ये तेल गरम करुन त्यामध्ये काळी मोहरी टाकल्यावर ती फुटु द्या. त्यानंतर त्यामध्ये हिंग, कढीपत्ता टाका. एका वाटीमध्ये हळद, मोहरी,मेथी या सगळ्यांची पावडर करुन घ्यावी. हिंग, लाल तिखट आणि मीठ मिक्स करुन, तेल थोड थंड झाल्यावर तयार केलेले मिश्रण मिक्स करावे.

बाजूला ठेवलेली किसलेली हळद या मिश्रणामध्ये घालावी आणि त्यानंतर ती सर्व चांगली मिक्स करून घ्यावी. त्यामध्ये थोडासा लिंबाचा रसही घालावा, आणि परत एकदा संपूर्ण मिश्रण मिक्स करुन घ्यावे. आता आंबे हळदीचे लोणचं तयार आहे.

# मुरबाड रेल्वेसाठी भिवंडीचे खा.सुरेश म्हात्रे यांचा संसदेत आवाज



मुरबाड : मुरबाड तालुका अनेक वर्षांपासून रेल्वेच्या प्रतीक्षेत आहे. मुंबईचे शिल्पकार नाना शंकर शेठ ज्यांना रेल्वेचे जनक म्हणून ओळखले जाते त्यांचा जन्म मुरबाडमध्ये झाला. पण दुर्दैवाने त्यांच्याच जन्मभूमीत आजपर्यंत रेल्वे होऊ शकलि नाही हि मोठी शोकांतिका म्हणावि की येथील लोकप्रतिनिधींची उदासिनता हा चर्चेचा विषय असला तरी सध्या संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन चालू असून या अधिवेशनात भिवंडीचे खासदार सुरेश म्हात्रे यांनी मुरबाड रेल्वेचा मुद्दा उपस्थित करून संसदेचे व अध्यक्षांचे लक्ष वेधले.

2022-23 मध्ये मुरबाड रेल्वे प्रकल्पाला मान्यता मिळाली 864 कोटींच्या प्रकल्पासाठी केवळ ₹1300 कोटींची गरज आहे ऑगस्ट 2022 पासून निधी रखडला, प्रकल्प ठप्प

जर हे ₹300 कोटी तातडीने मंजूर केले, तर मुरबाडवासीयांचे वर्षानुवर्षांचे स्वप्न साकार होईल आणि रेल्वेचे जनक नाना शंकर शेठ यांच्या स्मृतीस खरी श्रद्धांजली ठरेल असे आपल्या संसदेतील भाषणात ठणकावून सांगितले. संसदेत ठाम भूमिका घेत, या निधीसाठी त्वरित कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. मुरबाडकरांसाठी रेल्वे हवीच सरकारने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी आग्रही मागणी यावेळी खासदार सुरेश म्हात्रे यांनी केली.

# नैसर्गिक उपायाने हाडे करा मजबूत



निसर्गाचाच एक अविभाज्य भाग असणाऱ्या आपल्या शरीरात आणि निसर्गात अनेक गोष्टी एक सारख्या असतात आणि याचा उपयोग आयुर्वेदामध्ये खूप कार्यक्षमतेने करून घेतलेला आढळतो. अस्थिसंधी किंवा हाडसांधी नावाची एक वनस्पती असते. हिला पाहून हिचं अस्थि संधी हे नाव किती समर्पक आहे हे समजू शकतं. अक्षरशः छोटी छोटी हाडं एकमेकांवर जोडून ठेवलेली आहेत असं या वेलीकडे बघून वाटतं. दिसायला एकदम आगळीवेगळी पण एकदा बघितली की लक्षात राहणारी आणि त्यामुळे पटकन ओळखू येणारी ही वेल खरोखरच हाडांची शक्ती वाढण्यासाठी आणि तुटलेलं हाड पुन्हा जोडण्यासाठी खूप उपयुक्त असते.

सध्या कार्यक्षमतेने झालं तर त्यावर लगेच मलम केले जातं पण मणका, बरगड्या वगैरे ठिकाणी कार्यक्षमतेने झालं तर मलम घालता येत नाही किंवा केसांची रेषा कार्यक्षमतेने झालेलं असेल तर त्यावरही मलम घातलं जात नाही. अशा वेळेला हाडसांधी ठेचून तयार केलेला लेप वरून लावल्यानी हाड लवकरात लवकर पूर्ववत होण्यास मदत मिळते. हाडांना ताकद देणारी असल्यामुळे हाड संधी ऑस्टिओपोरोसिसवर ही उपयुक्त असते. यासाठी या वनस्पतीचा ताजा रस अधिक प्रभावी असतो.

दोन चमचे रस सकाळ संध्याकाळ घेण्यानी हाडांची घनतामध्ये सुधारणा होते असं संशोधनमध्ये दिसून आलेलं आहे. अर्थात ताजा रस उपलब्ध नसेल तर हाडसांधीचं चूर्ण घेतलं तरी चालतं. ही वेल लावणं अगदी सोपं असतं. साध्या कुंडीत जरी हाडसांधीचं छोटं कटिंग लावलं तरी ते सहज लागतं आणि वेल बघता बघता पसरते. त्यामुळे मंडळी, पुढच्या वेळेला नर्सरीमध्ये गेलात तर अस्थिसंधीचं छोटं रोप नक्की घेऊन या आणि हाडांच आरोग्य उत्तम ठेवा.

# डोंबिवलीत मेंढयांची झुंज

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



## ३० जणांवर गुन्हा दाखल

डोंबिवली : काही दिवसांपूर्वी कल्याण ग्रामीण भागात कायद्याने बंदी असताना ही बैलांची झुंज खेळवण्यात आली होती. यानंतर आता मेंढ्यांची झुंज खेळवण्यात आली असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. शिळफाटा रोड परिसरात टाटा पॉवर जवळील जागेत रविवारी सायंकाळी ही झुंज खेळवण्यात आली. कल्याण गुन्हे शाखेला याची माहिती मिळताच पोलिसांनी त्यावर कारवाई केली. याप्रकरणी टिळकनगर पोलीस ठाण्यात 30 जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून यात उच्च शिक्षित तरुणांचा सहभाग आढळून आला आहे. यातील 10 जणांना पोलिसांनी ताब्यात घेत समजपत्र दिले आहे.

टिळकनगर पोलीस ठाण्यात गुन्हे शाखा घटक 3 चे पोलीस शिपाई विजय नवसारे यांनी दाखल तक्रारीनुसार डोंबिवली पूर्वेतील नवीन कल्याण रोडवरील टाटा पॉवर कंपनी समोर रविवारी सायंकाळी 6 च्या दरम्यान ही झुंज खेळवण्यात आली. धक्कादायक म्हणजे डोंबिवलीत या मेंढ्यांच्या झुंजी खेळविण्यासाठी आणि बघण्यासाठी पुण्यातील कोंढवा, जोगेश्वरी, मालाड, वडाळा, अंधेरी भागातील उच्चशिक्षित तरूण, व्यावसायिक, नोकरदार सहभागी झाले होते. एक जण उच्चशिक्षित अभियंता, माशांची शेती करणारा, एक कापड दुकानदार, एका विमान कंपनीच्या सेवेते सुरक्षा रक्षक असा नोकरदार वर्ग या खेळांमध्ये सहभागी झाला होता. या झुंजीची माहिती कल्याण गुन्हे शाखेला मिळताच पोलिसांनी त्याठिकाणी जात ही कारवाई केली. त्यानुसार टिळकनगर पोलीस ठाण्यात 30 जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नासीर नारु अस्लम नारु (वय 30 इंजिनिअर), सईद अली हाशमी (वय 40, सेक्युरिटी तुर्की एअरलाईन्स), अतिक रफिक शेख (वय 36, कापड दुकान), अझर बुकवाला (वय 27), नविद अठाणी (वय 29), फैसल खान (वय 30), वशीम शहा (वय 34, व्यापारी), इमरान मोटरवाला (वय 42, इस्टेट एजंट), सरफराज हुसेन शेख (वय 24), वलीद जत (वय 34, माशांची शेती) यांसह इतर 25 ते 30 जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारतीय नागरी सुरक्षा संहिता 2023 चे कलम 35 (3) अन्वये दहा जणांना नोटीस बजावण्यात आली आहे.पोलीस ठाण्यातील दाखल तक्रारीनुसार शिळफाटा रस्त्यावरील टाटा पॉवर समोरील जागेत 30 जण दोन मेंढ्यांच्या झुंजी लावण्याची स्पर्धा खेळत होते. या मेंढ्यांच्या झुंजी लावताना दोन्ही गटाकडून आपल्या मेंढ्या जिंकण्यासाठी त्यांना प्रोत्साहित केले जात होते. मेंढ्या झुंजींना शासनाची बंदी आहे. हे माहिती असुनही या झुंजी खेळविल्या जात होत्या. या झुंजी खेळताना एखाद्या मेंढ्याला दुखापत झाली. त्याचा मृत्यू झाला तर त्याची जबाबदारी कोणाची. असाही प्रश्न निर्माण झाला होता. या मेंढ्यांच्या झुंजीचा खेळ पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. पाचहून अधिक नागरिकांना एकत्र येण्यास पोलिसांचा मनाई आदेश आहे. झुंजींसाठी पाचहून अधिक नागरिकांना एकत्र आणून पोलिसांच्या मनाई आदेशाचा भंग केला.

दोन मेंढ्यांची झुंज लावून झुंजीत एखाद्या मेंढ्याचा मृत्यू होऊ शकतो, अगर मेंढ्यास जखम होऊन इजा होऊ शकते. हे माहीत असतानादेखील तसेच मेंढ्यांच्या झुंजीवर बंदी असताना त्या झुंजी लावून शासन आदेशाचे उल्लंघ केले म्हणून 30 जणांवर कलम 125 सह प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम 1960 चे कलम नुसार 30 जणांवर गुन्हा दाखल केला. याप्रकरणाचा आता टिळकनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार कदम यांच्या आदेशावरून उपनिरीक्षक आर. वाय. चौगुले हे अधिक तपास करत आहेत. काही दिवसापूर्वी सोनारपाडा भागात बैलांच्या झुंजी लावणाऱ्या दोन्ही गटातील बैल मालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. बैल, मेंढे, कोंबड्यांच्या झुंजी लावून त्यावर धनाढ्य लोक मोठा सट्टा खेळतात. यातून मोठी उलाढाल होत असते. या सट्टा बाजारामुळे पोलिसांना अंधारात ठेऊन या झुंजी खेळण्याचा आयोजकांचा प्रयत्न असतो.

# महिला बचत गटांसाठी तालुक्यात 'अस्मिता भवन'

## - मंत्री आदिती तटकरे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : ३ महिलांना औद्योगिक क्षेत्रात सक्षम करण्यासाठी बाजारपेठ असलेल्या तालुकास्तरावर अस्मिता भवन उभारण्यात येणार आहे. यामाध्यमातून महिला बचत गटांना व्यवसाय करण्याची संधी प्राप्त होणार असल्याचे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले. शंभर दिवस कृती आराखड्याबाबत मंत्रालयात आज बैठक झाली. यावेळी रोहा येथे गारमेंट प्रकल्प कार्यान्वित करणे, तालुकास्तरावर अस्मिता भवन उभारणे, महिला आर्थिक विकास महामंडळाचे कामकाज, राज्य बालहक्क संरक्षण आयोग अशा विविध विषयावर चर्चा झाली. याप्रसंगी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी श्रीवर्धन येथे सोलार फिश ड्राईंग प्रोजेक्ट अंतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ मार्फत नव तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण उद्यम विकास प्रकल्प राबवण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत बाजारभिमुख उद्योग विकास घटकांतर्गत शेती, शेतीसंलग्न व बिगर शेती आधारित उद्योगांना व नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. याचबरोबर रोहा येथील गारमेंट प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठीचे युनिट शहरासह ग्रामीण भागातही सुरू करण्यात यावे. प्रकल्पासाठी पात्र महिलांना योग्य प्रशिक्षण आणि मानधन मिळण्यासाठी पारदर्शक कार्यप्रणाली राबवावी, निर्देशही तटकरे यांनी दिले.

# गटारांवरील झाकणाअभावी वृद्धाचा अपघात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : स्मार्ट सिटी म्हणून कल्याणचा बऱ्याच दिवसांपासून बोलबाला होत आहे. कल्याण पश्चिम रेल्वे स्थानक परिसरात स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत विकासकामे सुरू आहेत. मात्र त्याच कामांमध्ये ठेकेदारांकडून गंभीर हलगर्जीपणा केला जात असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना मात्र मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. शहरातील गटारांवर झाकण नसल्याने एका पादचारी त्यात पडला आणि दुखापत झाल्याची घटना घडली आहे. यामुळे नागरिकांमध्ये अतिशय नाराजीचं वातावरण आहे.


### नेमकं काय घडलं ?

कल्याण न्यायालय आणि तहसीलदार कार्यालयाबाहेरच्या मुख्य रस्त्यालगत खोदलेल्या गटारींवर झाकण बसवण्यात आलेले नाही. ठेकेदारांनी नियमांकडे दुर्लक्ष करत झाकणाऐवजी फक्त लाकडी फळी ठेवली आहे. काल या फळीवरून जात असताना एक वयोवृद्ध नागरिक तोल जाऊन थेट गटारात पडले. आजूबाजूच्या परिसरातील पोलीस आणि नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली आणि त्या वृद्धाला गटारातून बाहेर काढलं. मात्र या हलगर्जी कारभाराविरोधात संताप व्यक्त करण्यात येत आहे.

"ही घटना प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे घडली आहे. नागरिकांच्या सुरक्षेची कोणतीही काळजी घेतली जात नाही."स्मार्ट सिटीच्या नावाखाली लोकांच्या जीवाशी खेळ केला जात आहे असा आरोप शहरातील नागरिकांकडून केला जात आहे. असे प्रकार घडू नयेत, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने त्वरित उपाययोजना करावी अशी मागणी केली जात आहे. धक्कादायक गोष्ट म्हणजे अशी घटना घडूनही प्रशासनाने कोणतीही दखल घेतली नाही. नागरिकांनी ठेकेदार आणि प्रशासनावर कारवाईची मागणी केली आहे. आता प्रशासन यावर काय भूमिका घेते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# होर्डिंगचे उत्पन्न खातंय कोण ?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



पालघर : पालघर शहरातील तब्बल ४४ होर्डिंग अनधिकृत असल्याचे दिसून आले आहे. शहराला बकाल स्वरूप बहाल करणाऱ्या या होर्डिंगचे गेली अनेक वर्षं उत्पन्न कोणाच्या खिशात जात होते, असा सवाल उपस्थित झाला आहे. तसेच नगर परिषदेचे तत्कालीन पदाधिकारी व नगरसेवकांनी वेळोवेळी केलेल्या स्व:प्रसिद्धीमागील गुपित उघड झाले आहे.

घाटकोपरच्या होर्डिंग दुर्घटनेनंतर मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने राज्य सरकारने उच्चस्तरीय समिती गठीत केली आहे. उच्च न्यायालयात दाखल याचिकेची सुनावणी जानेवारी २०२४ च्या अखेरीस आयोजित करण्यात आली होती. त्या निमित्ताने पालघर नगर परिषदेने इतर स्थानिक स्वराज्य संस्थांप्रमाणे अनधिकृत होर्डिंग, बॅनर, फ्लेक्स यांच्यावर कारवाई आरंभली आहे.निद्रा अवस्थेत असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींना जाग आली व होर्डिंग, बॅनर, फ्लेक्स पोस्टर इत्यादी निष्काशीत करण्यासाठी एकच धांदल उडाली. शहरातील बहुतांश बॅनर अनधिकृत असल्याचे या कारवाईत पुढे आले. पालघर शहरातील प्रमुख चौक हे बॅनर व होर्डिंग सदैव व्यापले असल्याने अनेकदा दिशादर्शक फलक वाहनचालकांच्या नजरेत पडत नसत. राजकीय मंडळी राष्ट्रीय महामार्गावरील सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून उभारलेल्या फलकांवर बॅनर लावत असत. अशा बाबींना आगामी काळात आळा बसणार आहे. शहरातील चौक व इतर प्रमुख रस्ते बॅनरमुक्त होतील, अशी आशा आहे. पालघर नगर परिषदेच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन पूर्व परवानगीशिवाय बॅनर झळकवण्याविरुद्ध आगामी काळात कठोर कारवाई होईल अशी अपेक्षा आहे.

# कांदळवन धोक्यात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



उरण : जैवविविधता आणि निसर्ग संवर्धनासाठी महत्वपूर्ण असलेल्या उरणमधील कांदळवन विभागाच्या अखत्यारीतील दोन हजार हेक्टर कांदळवन क्षेत्राची सुरक्षा पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे. अनेक ठिकाणी कांदळवनाच्या जंगलावर मातीचा भराव टाकून, त्याला आगी लावून किंवा या वृक्षांवर कचरा टाकून ती नष्ट केली जात आहेत.

उरण परिसरात हजारो हेक्टर भूखंडावर कांदळवन आहे. या कांदळवनाच्या सुरक्षेची जबाबदारी सुरुवातीला वन विभागाकडे होती. त्यात बदल करून सध्या ही जबाबदारी शासनाने स्वतंत्र निर्माण केलेल्या कांदळवन कक्षाकडे सोपवली आहे. यात प्रथम वन विभाग आणि आता कांदळवन कक्ष यांच्या दुर्लक्षामुळे येथील कांदळवनाची सुरक्षाच धोक्यात आली आहे. उरण तालुक्यातील अनेक भागात रस्ते,बांधकाम,गोदाम तसेच इतर उद्योग व्यवसायाच्या उभारणीसाठी कांदळवन नष्ट केले जात आहे. यात खाडीवरील बेकायदेशीर स्लूस गेट बंद केल्याने पाणथळ कोरडी पाडून कांदळवन नष्ट केली जात आहे. या संदर्भात पर्यावरणवाद्यांनी तक्रार केली आहे.उरण आणि वाशीमध्ये मोठ्या ओल्या जमिनी आणि खारफुटीचे पट्टे गाडले जात आहेत.त्यानंतरच्या अधिकृत तपासणीनंतर नुकसानीची पुष्टी करूनही कोणतीही कारवाई झाली नसल्याबद्दल कार्यकर्त्यांनी खेद व्यक्त केला आहे. आशा प्रकारच्या घटना चिंताजनक आहे कारण आंतरराष्ट्रीय जैवविविधता निर्देशांकात भारत १८० देशांपैकी १७६ व्या क्रमांकावर आहे आणि ही वेळ आली आहे. येथील जैवविविधता पुन्हा निर्माण करायला हवी असे मत नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन.कुमार यांनी व्यक्त केले आहे. उरण तालुक्यातील अनेक ठिकाणी कांदळवन(खारफुटीची)तोडही केली जात आहे. यासाठी जेसीबीचा वापर केला जात आहे.

### सुरक्षेसाठी कवेळ तीन कर्मचारी

उरण- पनवेल परिसरातील २ हजार ३०० हेक्टर जमीनीवरील कांदळवन क्षेत्र वन विभागाने कांदळवन कक्षाकडे हस्तांतरित केले आहे. मात्र या क्षेत्राच्या सुरक्षेसाठी केवळ तीन कर्मचारी काम करीत आहेत. अशी माहिती कांदळवन विभागाने दिली आहे.

# अवैध दारु विरोधी कारवाईत मृत्यू पावलेल्या जवानाच्या वारसांना नुकसान भरपाई

## - उपमुख्यमंत्री अजित पवार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : अवैध दारू विरोधी कारवाईत मृत्युमुखी पडलेल्या नाशिक येथील राज्य उत्पादन शुल्क कार्यालयातील जवान तथा वाहन चालक कैलास गेणू कसबे यांच्या कुटुंबीयांना शासनाकडून विशेष बाब म्हणून साडेसात लाख रुपयांची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे. तसेच भविष्यात अशा प्रकरणांमध्ये सत्वर मदत होण्याच्या दृष्टीने गृह विभागाच्या धर्तीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कायमस्वरुपी धोरण तात्काळ करण्याचे निदेशही देण्यात आले आहेत अशी माहिती, उपमुख्यमंत्री तथा राज्य उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांनी दिली. नाशिक राज्य उत्पादन शुल्क विभाग भरारी पथक क्र.१ मधील अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात अवैधपणे मद्यविक्री करणाऱ्या ढाब्यावर ७ जुलै २०२४ रोजी रात्री कारवाई केली होती. अवैध मद्यविक्री करणाऱ्या आरोपींच्या वाहनाचा पाठलाग करीत असताना राज्य उत्पादन शुल्क नाशिक यांच्या भरारी पथकाच्या वाहनाला आरोपींच्या वाहनाने धडक दिली व त्यामध्ये जवान तथा वाहनचालक कैलास गेणू कसबे यांचा मृत्यू झाला होता.उपमुख्यमंत्री तथा राज्य उत्पादन शुल्क मंत्री श्री.पवार यांनी या खात्याचा कार्यभार घेताच या प्रकरणात वैयक्तिक लक्ष घातले. त्यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे सन २०१४ मध्ये गृह विभागाने केलेल्या मदतीच्या धर्तीवर (पोलीस दलातील कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय ठरल्याप्रमाणे साडेसात लाख रुपये) राज्य उत्पादन शुल्क विभागातील दिवंगत जवान कैलास कसबे यांच्या वारसांना विशेष बाब म्हणून रु.७.५० लाख नुकसान भरपाई मंजूर केली आहे.

# अनधिकृत नळ जोडण्या : पालिकेची कारवाई



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी :मौजे- जुना गौरीपाडा, घर नं-३९९/०, साहिल हॉटेलच्या बाजुला, भिवंडी येथील अनाधिकृत बांधकाम असेलेले ही इमारत तळ अधिक ६ मजली असुन सदर इमारतीबाबत मा. उच्च न्यायालयात व मा. भिवंडी दिवाणी न्यायालयात दावा असुन सदर इमारतीबाबत मा. उच्च न्यायालयाने निष्कासित करण्याचे आदेश दिले आहेत परंतु मा. भिवंडी दिवाणी न्यायालयात स्थगिती दावा असल्याने इमारत निष्कासनाची तुर्तस कार्यवाही करता आली नाही. तसेच सदर इमारती मध्ये कुठल्याही प्रकारची कर आकारणी न केल्याने इमारतीत रहिवास वापर असून अनाधिकृत प्रकारे नळ कनेक्शन घेतल्याचे आढळुन आल्याने मा. श्री. अजय वैद्य (आयुक्त तथा प्रशासक) सो. व मा.श्री. बाळकृष्ण क्षीरसागर, उप-आयुक्त (अति.व अ.बां.) सो. यांनी दिलेल्या आदेशानुसार सहाय्यक आयुक्त प्रभाग समिती क्रमांक ४, कार्यालयीन अधिक्षक प्रभाग समिती क्रमांक ४ व कर निरिक्षक प्र.स.क्र.४ यांच्या समवेत अतिक्रमण पथक व पाणीपुरवठा विभागातील कर्मचारी यांच्या सहाय्याने आज दिनांक ०४/०२/२०२५ रोजी सदर इमारतीमधील रहिवास असलेले एकुण २१ नळ कनेक्शन खंडीत करुन तेथील पाण्याचे विद्युत मोटर प्रभाग समिती क्र.०४ च्या कार्यालयात जमा करण्याची धडक कार्यवाही करण्यात आली. तरी यापुढे अशा कुठल्याही प्रकारच्या इमारतीत घरपट्टी व पाणीपट्टी थकबाकी असल्यास तसेच कोणत्याही प्रकारची कर आकारणी इमारतीवर झाले नसल्याचे आढळल्यास प्रभाग समिती क्र.०४ चा अंर्तगत कार्यवाही करण्यात येईल याची सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी.

# सिद्धिविनायक मंदिरातील वस्त्रसंहिता योग्यच



## सरकारीकरण झालेल्या सर्वच मंदिरात वस्त्रसंहिता लागू करा – महाराष्ट्र मंदिर महासंघ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : श्री सिद्धिविनायक मंदिर प्रशासनाने लागू केलेल्या वस्त्रसंहितेच्या निर्णयाचे महाराष्ट्र मंदिर महासंघ स्वागत करत त्याला पूर्ण पाठींबा देत आहे. मंदिर हे पवित्र धार्मिकस्थळ आहे. ते आपल्या संस्कृती आणि परंपरांचे केंद्रस्थानही आहेत. त्यामुळे तेथे योग्य पोषकाचे पालन होणे आवश्यक आहे. मंदिर व्यवस्थापनाने घेतलेल्या या निर्णयामुळे मंदिरातील वातावरण अधिक पवित्र आणि शिस्तबद्ध राहील, असे मत महासंघाने व्यक्त केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आदर्श : देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी हे स्वतःच्या (एस्.पी.जी.) सुरक्षारक्षकांसह गुरुवायूर मंदिर, तसेच गुरुद्वारामध्ये दर्शनासाठी जातांना तेथील वस्त्रसंहितेचे पालन करून जातात. जेव्हा देशाच्या सर्वोच्च नेत्याने असा आदर्श घालून दिला आहे, तेव्हा सर्वसामान्य भाविकांसाठी मंदिर प्रशासनाने घालून दिलेल्या वस्त्रसंहितेचे पालन करण्यात कोणतीही अडचण असता कामा नये. तसेच श्री सिद्धिविनायक मंदिराने घेतलेल्या या निर्णयाचा आदर्श इतर सरकारीकरण झालेल्या सर्वच मंदिरांनी घ्यावा, असेही महासंघाने म्हटले आहे.

केवळ हिंदू मंदिरांवरच आक्षेप का? : 'विद्येच्या मंदिरा'मध्ये (शाळेत) ड्रेसकोड चालतो, 'न्यायाच्या (न्यायालय) मंदिरा'त ड्रेसकोड चालतो, तसेच 'लोकशाहीच्या मंदिरा'तही (विधान भवन) येथे ड्रेसकोड चालतो, तर मग केवळ मंदिरातील ड्रेसकोडवर आक्षेप का ? असा सवाल करत मंदिर महासंघाने पुढे स्पष्ट केले आहे की, मंदिरातील वस्त्रसंहिता ही केवळ महिलांना लागू करण्यात आलेली नसून ती सर्वांसाठीच लागू करण्यात आलेली आहे. त्यामुळे हा 'महिलांवर अन्याय' असल्याचे म्हणणे हा खोटा प्रचार आहे. उज्जैनचे श्री महाकालेश्वर मंदिर, श्री काशी विश्वेश्वर मंदिर, श्री तिरुपती बालाजी मंदिर यांसह देशभरातील अनेक मंदिरांमध्ये भाविकांसाठी वस्त्रसंहिता लागू केलेली आहे. इतकेच नव्हे, तर चर्च, मशिदी, गुरुद्वारा यांसह पोलीस ठाणे, रुग्णालये, सरकारी कार्यालये अशा अनेक ठिकाणी विशिष्ट प्रकारचे पोशाख बंधनकारक आहेत; मात्र केवळ हिंदू मंदिरामध्ये अशा नियमांवर आक्षेप घेतला जातो, हे खेदजनक आहे.

संस्कृतीचे संरक्षण गरजेचे : मंदिरात जाणाऱ्या भाविकांनी योग्य वस्त्र धारण करावे, यासाठी मंदिर प्रशासनाने केलेले आवाहन योग्यच आहे. मंदिर हे श्रद्धास्थान असून, तेथे जाणाऱ्या प्रत्येकाने भाविक वृत्तीने आणि भक्तिभावाने जाणे आवश्यक आहे. त्यामुळे वस्त्रसंहितेचा नियम हा भक्तांच्या सन्मानासाठी असून व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधन नाही.

**कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण**

मा. शरदचंद्रजी पवार मुख्य बाजार आवार, एन टाईप इमारत,
१ ला मजला कल्याण- शिळ रोड कल्याण (प) जि. ठाणे - ४२१ ३०१
दूरध्वनी क्रमांक (०२५१) २९७०३१६० mail:- apmckalyan@rediffmail.com

**जाहिर सुचना**

कल्याण कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सर्व अनुज्ञप्तीधारक आडते, व्यापारी, प्रक्रिया करणार, हमाल, माथाडी, मापाडी व इतर बाजार आवारात काम करणा-या सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) नियम १९६७ मधील तरतुदी नुसार बाजार वर्ष २०२५-२०२६ करीता अनुज्ञप्ती नुतनीकरणासाठी संबंधीत अनुज्ञप्तीधारकांनी आपले कडील समितीस येणे असलेल्या सर्व रक्कमांचा भरणा करुन दि. २८.२.२०२५ पुर्वी प्रत्यक्ष हजर राहुन अर्ज करावेत. दि. २८.२.२०२५ नंतर आलेले आडते, व्यापारी, प्रक्रिया करणार यांचे अर्ज अनुज्ञप्ती फी च्या प्रति दिन १० टक्के विलंब आकार शुल्क घेऊन व इतर अनुज्ञप्तीधारींना प्रति दिन र.रु. १/- विलंब आकार शुल्क जितके दिवस विलंबाने सादर केला जाईल तितके दिवसां करीता भरावा लागेल,

नुतनीकरणासाठी करावयाच्या अर्जाचे नमुने कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती कल्याण "एन" टाईप इमारत, पहिला मजला, मुख्य मार्केट यार्ड, कल्याण शिळ रोड, कल्याण (प) जि. ठाणे येथे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व वेळेत मिळतील. विहीत माहितीसह भरलेले अर्ज कार्यालयीन वेळेत तेथेच स्विकारले जातील, भरलेला विहीत अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहेत.

१) अर्जदारांची स्वाक्षरी पडताळणी करीता अर्जदाराच्या (अनुज्ञप्ती धारकाची) पॅनकार्ड/आधारकार्ड झेरॉक्स,
२) खरेदीदारांचे बाबतीत समितीचे बाजार आवारातुन शेतमाल खरेदी केलेल्या नोंदणीकृत अनुज्ञप्तीधारक व्यापा-यांची बाजार समिती सेस लावलेली छापील क्रमांक असलेली खरेदीच्या बिलाची झेरॉक्स.
अधिक माहितीसाठी कार्यालयात संपर्क साधावा,

सही/-
(संजय जी. एगडे)
सचिव
कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती,
कल्याण जि. ठाणे

शिक्का

सही/-
(दत्तात्रय मो. गायकवाड)
सभापती
कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती,
कल्याण जि. ठाणे

जावक क्रमांक - कृउबास/अनु.नुत. जाहिर सुचना/१६५३ /२०२५ दि. ०३.०२.२०२५

# भिवंडी मनपाच्या वतीने रन फॉर लेप्रोसी मॅरेथॉनचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : ३० जानेवारी राष्ट्रपिता महात्मा गांधी पुण्यातिथी निमित्त राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन व स्पर्श जनजागृती अभियानांतर्गत मा. श्री. अजय वैद्य (प्रशासक तथा आयुक्त) व डॉ. गिता काकडे, सहाय्यक संचालक आरोग्य विभाग (कुष्ठरोग) ठाणे, मा. श्री. डॉ. संदिप गाडेकर (मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी) यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ४/०२/२०२५ राजी BNN महाविद्यालय येथे " रन फॉर लेप्रोसी मॅरेथॉन " स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांना कुष्ठरोगा बददल माहीती देऊन मॅरेथॉन स्पर्धेची सुरवात करण्यात आली. यावेळी डॉ. बुशरा सय्यद (शहर क्षयरोग वैद्यकिय अधिकारी) यांनी ध्वज दाखवून स्पर्धेला सुरवात केली. स्पर्धेत एकूण ६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतीमेस पुष्पहार अरपण करुन स्पर्धेतील विजयी विद्यार्थी प्रथम क्रं. मुली मध्ये दिव्या चौरसिया व मुलांमध्ये सैफ अली, द्वितीय क्रं. मुली मध्ये अंजली यादव व मुलांमध्ये भारती सुरज, तृतीय क्रं. मुली मध्ये शिल्पा कुमावत व मुलांमध्ये गुप्ता अभिषेक, ईत्यादी विद्यार्थ्यांना श्री. सुरेंद्र भास्कर भोईर (सहाय्यक आयुक्त प्र. स.क्र - ३), डॉ. बुशरा सय्यद (शहर क्षयरोग वैद्यकिय अधिकारी), श्री. सुरज गायकवाड (बिट निरिक्षक) भिवंडी निजामपूर शहर म.न.पा. यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. व कुष्ठरोगा विषयी प्रतिज्ञा घेण्यात आली.

कुष्ठरोगा बदल समाजामध्ये असलेले गैरसमज दूर करण्यासाठी शासन स्थरावर विविध कार्यक्रांचे आयोजन करण्यात येत आहे. कुष्ठरोग हा जंतुमूळे होणारा आजार आहे. कुष्ठरोग हा मंदगतीने वाढणारा आजार आहे. याची लक्षणे दिसण्यासाठी कमीत कमी तीन ते दहा वर्षाचा कालावधी जातो. याचे मुख्य लक्षण म्हणजे न खाजणारा न दुखणारा लालसर पांढरा चटटा हे आहे. शरीरावर गाठी येणे, कानाच्या पाळया जाड होणे, चेहरा तेलकट होणे हे लक्षणे प्रामुख्याने आढळतात. बहुविध औषधोपचाराने कुष्ठरोग बरा करणे शक्य झाले आहे. कुष्ठरोगावर वेळेत उपचार घेतल्यास लवकर व पूर्णपणे बरा होतो. समाजांमध्ये कुष्ठारोगाबदल असलेले गैर समज दूर करुन कुष्ठरुग्णांना समाजामध्ये चांगली वागणूक देण्याकरीता जनजागृती करणे हा मूळ उददेश आहे. या कार्यक्रमांचे आयोजन सहाय्यक संचालक आरोग्य विभाग (कुष्ठरोग) ठाणे व भिवंडी निजामपूर शहर म.न.पा., BNN महाविद्यालय यांच्या विद्यामाने संयुक्त रित्या घेण्यात आले. यावेळी कार्यक्रमांस डॉ. संजना सुनक, डॉ. मिनल मॅडम. कुष्ठरोग विभगाचे कर्मचारी श्री. किसन ढेरे, बळीराम कांबळे, शिवाजी करपे, जितेंद्र आकाडे व BNN महाविद्यालय क्रिडा शिक्षक श्री. कॅप्टन जाधव सर उपस्थित होते.

> "कुष्ठरोगाबाबत एकत्रितपणे जनजागृजी वृध्दींगत करु, त्याबाबतचा गैरसमज दुर करु व कुष्ठरोगाने बाधित एकही व्यक्ती मागे राहणार नाही याची दक्षता घेऊ."
> - श्रीकांत परदेशी
> माहिती व जनसंपर्क अधिकारी
> भिवंडी निजामपूर शहर म.न.पा.

# अंजली दमानियांवर दावा दाखल करणार

## – धनंजय मुंडे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राजकीय वर्तुळात सध्या संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरीच झडत आहेत. त्यात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी हे प्रकरण उचलून धरत मंत्री धनंजय मुंडे यांना चांगलेच धारेवर धरले आहे.

त्यात आज अगोदर दमानियांची पत्रकार परिषद आणि त्यावर मुंडेनी देखील पत्रकार परिषद घेतली मात्र त्यांचे हे परिषदांचे सत्र आणि आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडणे सुरूच आहे.

आता मुंडे यांनी त्यांच्या एक्स या सोशल मिडीया साईटवर पोस्ट करत दमानियांना उत्तर दिले आहे. ते म्हणाले की, अंजली दमानिया यांनी आज पुन्हा दिवसातून दुसऱ्यांदा पत्रकार परिषद घेत माझ्यावर खोटे व बेछूट आरोप केले आहेत. मी पुन्हा एकदा स्पष्ट करू इच्छितो की, कृषी विभागातील तत्कालीन खरेदी प्रक्रिया नियमातील तरतुदीनुसार व मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अंतिम मान्यतेनंतरच झाली आहे, त्यानंतरच पुढील कार्यवाही सुरु झाली. यांसह इतर अनेक मोघम आरोप करणाऱ्या दमानिया ताई यांच्यावर मी लवकरच फौजदारी अब्रु नुकसानीचा खटला मुंबई उच्च न्यायालयात दाखल करणार आहे.

दरम्यान दमानियांनी मागच्या सरकारमध्ये मुंडे कृषीमंत्री असताना कृषी साहित्य खरेदीमध्ये घोटाळा केल्याचा आरोप केला आहे. त्यावर आता धनंजय मुंडेंनी पत्रकार परिषद घेत प्रत्युत्तर दिले आहे. पत्रकार परिषदेत बोलताना दमानिया म्हणाल्या की, एक कृषीमंत्री शेतकऱ्यांचे पैसे कसे खातो, हे मी पुराव्यानिशी सांगणार असल्याचे सांगत वर्षभराच्या काळात धनंजय मुंडेंनी 275 कोटींचे पाच घोटाळे केल्याचा गंभीर आरोपही दमानिया यांनी धनंजय मुंडेंवर केला.

# रेल्वे वाहतूकीला मिळणार गती

## कल्याण ते कसाऱ्यादरम्यान नवीन मार्गिकेचा प्रस्ताव

शहापूर : शहापूर आणि कल्याण या ठाणे जिल्ह्यातील २ तालुक्यांमधील मध्यरेल्वेच्या वाहतूकीला गती देण्यासाठी थेट कल्याण ते कसाऱ्यापर्यंत नव्या पायाभूत सुविधा उभारण्यासाठी मध्यरेल्वे प्रशासनाने चाचपणी सुरु केली आहे. कल्याणहून शहापूर तालुक्यातील कसाऱ्यापर्यंतच्या लोहमार्गावर नवीन मार्गिका उभारण्याचा प्रस्ताव रेल्वे मंडळाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आला आहे. विशेष म्हणजे, नव्या रेल्वे मार्गामुळे एकाच मार्गे धावणाऱ्या मुंबई उपनगरी रेल्वे आणि लांब पल्ल्याच्या मेल व एक्स्प्रेससाठी स्वतंत्र मार्गिका यामुळे उपलब्ध होणार आहे.

मध्यरेल्वेच्या कल्याण स्थानकापुढील मुंबई पर्यंतच्या स्थानकांवर रेल्वेगाड्यांची वर्दळ मोठ्या प्रमाणात आहे. म्हणूनच भविष्यात उपनगरी रेल्वेच्या फेऱ्या वाढवण्यासाठी कल्याण ते कसारा अशी नवी अर्थात चौथी मार्गिका उभारण्यात येणार आहे. प्रस्तावित मेगा टर्मिनसवरून नव्या मेल व एक्स्प्रेस चालवण्यासाठी वापरात असलेल्या रेल्वेच्या पायाभूत सुविधा वाढवण्याच्या सूचना रेल्वे मंडळाने देशातील सर्व क्षेत्रीय रेल्वे प्रशासनांना दिल्या आहेत. त्यानुसार येथील मार्गिकेचे काम २ टप्प्यांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

कल्याण ते शहापूरच्या आसनगांवदरम्यान ३२ किमीची चौथी मार्गिका यापूर्वीच मंजूर झाली आहे. त्यासाठी २५ हेक्टर जागेची आवश्यकता आहे. तसेच या प्रकल्पासाठी ३९८ •८८ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. सद्यस्थितीत या मार्गिकेसाठी येथे भूसंपादनाची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. कल्याण ते कसारादरम्यान ६७ किमी लांबीच्या तिसऱ्या मार्गिकेचे काम २ टप्प्यांत होत आहे. कल्याण ते आसनगाव आणि आसनगाव ते कसारा या दोन्ही मार्गाचे ५२ टक्के काम पूर्ण झाले आहे. आसनगाव ते कसारा टप्पा येत्या मार्च २०२५ आणि कल्याण ते आसनगाव डिसेंबर २०२५पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन ठेवण्यात आले आहे. तर नव्या मार्गिकांसाठी ५२ हेक्टर जागेची आवश्यकता आहे. त्यापैकी खासगी आणि सरकारी अशा एकूण ३६ हेक्टर जागेचे संपादन अद्यापपर्यंत पूर्ण झाले असून, वनखात्याच्या १६ हेक्टर जमिनीचे संपादन अद्याप बाकी आहे. कल्याण ते कसारा या तिसऱ्या मार्गासाठी १ हजार ३४२ कोटींचा खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे.

# पीक विमा घोटाळ्याची चौकशी करा

## – खा. सुप्रिया सुळे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : लोकसभेत आज झालेल्या प्रश्नोत्तराच्या चर्चेदरम्यान राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुळे यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत लाभदायक ठरलेल्या पीकविमा योजनेतील भ्रष्टाचार प्रकरणाबाबत प्रश्न विचारला. पीकविमा योजनेतील भ्रष्टाचार प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करणार, असे आश्वासन केंद्रीय कृषिमंत्र्यानी आज लोकसभेत दिले. सत्ताधारी असलेल्या भाजपचे आमदार सुरेश धस यांनी तो घोटाळा तब्बल 5 हजार कोटींचा असल्याचा दावा केला.

एवढंच नाही, तर महाराष्ट्राच्या कृषीमंत्र्यांनी पीक विमा योजनेत 500 कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची कबुली दिली. हा प्रकार अत्यंत गंभीर असून राज्यातील हजारो लाखो शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशाचा अपहार झाल्याची कबुली खुद्द सरकारनेच दिली आहे. राज्य शासनाच्या या कबुलीबाबत केंद्रीय कृषीमंत्री म्हणून आपणास याबद्दल माहित होते का? आणि या घोटाळयाच्या चौकशीचे आदेश आपण देणार का? असा प्रश्न खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला.

सुप्रियाताई सुळे बोलताना म्हणाल्या की, महाराष्ट्र राज्याच्या विद्यमान कृषी मंत्र्यांनी पीक विमा योजनेत 500 कोटींच्या घोटाळयाची कबुली राज्याला दिली. यावर सत्ताधारी पक्षाचे आमदार सुरेश धस यांनी हा घोटाळा 500 ऐवजी 5 हजार कोटींचा असल्याचा खळबळजनक दावा केला आहे. केंद्रीय कृषीमंत्री म्हणून तुम्हाला याबद्दल माहित होते का? मी तुम्हाला विनंती करते तुम्ही हो किंवा नाही यामध्ये उत्तर द्यावे आणि जर तुम्हाला याबद्दल काही माहित नसेल, तर घोटाळयाच्या चौकशीचे आदेश देऊन यावर योग्य ती कारवाई तुम्ही करणार का? असा प्रश्न सुप्रियाताई सुळे यांनी मांडला.

# मुंबई मनपा विभागाचा भोंगळ कारभार

# सफाई कर्मचारी ECG काढतात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्थेची दयनीय अवस्था ही नवी बाब राहिलेली नाही. कोविड महामारीच्या काळात सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची पुरती वाट लागली होती, आणि आजही परिस्थितीत फारसा फरक पडलेला नाही. पुण्यात सध्या गिअन बरे सिंड्रोम (GBS) या आजाराने थैमान घातले असतानाही, आरोग्यमंत्री आणि आरोग्य विभागाकडून कोणतीही ठोस पावले उचलली जात नसल्याचे चित्र आहे. नागरिकांनी कोणती काळजी घ्यावी, लक्षणे काय असतात, उपचाराची सोय कुठे आहे, याबाबत जनजागृती करणे अपेक्षित असताना सरकार उदासीनतेने वागत असल्याचा आरोप मनसे विद्यार्थी सेनेने केला आहे.

मनसे विद्यार्थी सेनेचे उपाध्यक्ष निलेश भोसले यांनी यासंदर्भात आरोप केले आहेत की, राज्यातील आरोग्य यंत्रणेच्या दुर्दशेचे एक भीषण उदाहरण मुंबईतील शताब्दी रुग्णालयात दिसले आहे. डिसेंबरमध्ये येथे घडलेल्या एका संतापजनक प्रकाराने संपूर्ण यंत्रणेचे बिंग फुटले आहे. रुग्णालयात प्रस्थापित वैद्यकीय

महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना

कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याचे कारण देत प्रशासन हात झटकत आहे. एका महिलेचा ECG सफाई कर्मचाऱ्याच्या हस्ते केली जात होती! या प्रकाराला रुग्णाच्या सोबत असलेल्या एका महिलेने वेळीच आक्षेप घेतला आणि संभाव्य गंभीर परिणाम टळले. पण प्रश्न हा आहे की, रुग्णालय प्रशासन, डीन, आणि जबाबदार डॉक्टर त्यावेळी कुठे होते?, महानगरपालिकेकडून भरती का काढली जात नाही?, या प्रकारावर आजतागायत कोणतीही कारवाई का झाली नाही? यापूर्वीही शताब्दी रुग्णालयात अशा अनेक गंभीर त्रुटी आढळल्या आहेत, मात्र सरकार आणि प्रशासन कोणतीही ठोस कारवाई करताना दिसत नाही. जणू काही सर्वसामान्य नागरिकांच्या जिवाची किंमत उरलीच नाही, असे सरकारच्या वागण्यावरून जाणवत आहे, असा आरोप भोसले यांनी केला आहे.

आरोग्य व्यवस्थेला व्हेंटिलेटरची गरज!

महाराष्ट्र हे एक आर्थिकदृष्ट्या विकसित राज्य असूनही आरोग्य व्यवस्थेला नेहमीच दुय्यम स्थान दिले जाते. ग्रामीण भागात तर प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टरच उपलब्ध नाहीत. त्यामुळे अनेक लोकांचे प्राण वाचू शकत असतानाही उपचाराअभावी त्यांचा मृत्यू होतो. या पार्श्वभूमीवर, मनसे विद्यार्थी सेनेचे उपाध्यक्ष निलेश भोसले यांनी सरकारवर कठोर शब्दांत टीका केली आहे. "सरकारच्या दुर्लक्षामुळे आज आरोग्य व्यवस्थेचे प्राण वाचवण्यासाठी स्वतःच व्हेंटिलेटरची गरज भासते आहे!" असे त्यांनी म्हटले आहे.

सरकारने तातडीने या समस्यांकडे लक्ष द्यावे, शताब्दी रुग्णालयातील प्रकाराची सखोल चौकशी करावी आणि राज्यातील सार्वजनिक आरोग्य यंत्रणेच्या सुधारासाठी ठोस पावले उचलावीत, अन्यथा जनतेचा रोष पत्करावा लागेल, असा इशारा भोसले यांनी दिला आहे.

# जीवनदीपमध्ये लक्ष सूर्यनमस्कार कार्यक्रम संपन्न



गोवेली : आपलं शरीर निरोगी आणि मजबूत राहण्यासाठी आपण नेहमीच पोषक अन्नग्रहण करत असतो. परंतु मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष करतो. आणि म्हणूनच आजच्या तरुण पिढीला मानसिक दृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी योगा खूप महत्त्वाचा आहे. त्यांनी मानसिक दृष्ट्या सक्षम व्हावं हा हेतू समोर ठेवून जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत लक्ष लक्ष सूर्यनमस्कार या कार्यक्रमाचा आयोजन करण्यात आलं होतं. यावेळेस योग शिक्षिका सायली जाधव आणि त्यांचे सहकारी यांची प्रमुख उपस्थित होती. या कार्यक्रमांमध्ये शकुंतला विद्यालय, सेंट थॉमस रोकडे विद्यालय ,निर्मल इंग्लिश स्कूल कनिष्ठ महाविद्यालय गोवेली जीवनदीप वरिष्ठ महाविद्यालय गोवेली जीवनदीप विधी महाविद्यालय गोवेली अशा वेगवेगळ्या शाळा व महाविद्यालयातील जवळपास सहाशे ते साडेसहाशे विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. यावेळेस मुलांना सूर्यनमस्काराचे महत्त्व समजावून त्यांकडून प्रात्यक्षिक रित्या सूर्यनमस्कार करून घेण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सतीश लकडे व आभार प्रदर्शन प्रा. धनगर यांनी केले.यावेळेस संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडवींदे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ के.बी कोरे संचालक प्रशांत घोडविंदे उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रकाश रोहणे मुख्याध्यापिका सौ. भावना कुंभार तसेच इतर सर्व प्राध्यापक त्याचबरोबर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा .दिनेश धनगर क्रिडा विभागाचे प्रमुख प्रा.मोहनीश देशमुख गगन सपकाळ, निकिता मॅडम ,चव्हाण सर प्रवीण भालेराव आणि सर्व शिक्षक स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते.

# ठाणे जिल्हा माहिती कार्यालयाचे समाजमाध्यम अकाऊंट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे :- ठाणे जिल्हा माहिती कार्यालय शासन व प्रशासनाशी संबंधित अधिकृत माहिती, समाजोपयोगी उपक्रमांची जनजागृती एक्स, फेसबूक, इन्स्टाग्राम, युट्यूब व थ्रेड्स या समाजमाध्यमांद्वारे सातत्याने करीत असते. ठाणे जिल्हा माहिती कार्यालयाच्या समाजमाध्यमांवरील या कामाची व्याप्ती व प्रभाव लक्षात घेता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर जिल्हा माहिती कार्यालयाचे समाजमाध्यम अकाऊंट लिंक करण्यात आले आहे. या माध्यमातून नागरिकांना शासन तसेच जिल्हा प्रशासनाचे अधिकृत अपडेट्स मिळण्यास मदत होणार आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदिप माने व जिल्हा राष्ट्रीय सूचना व विज्ञान अधिकारी नरेंद्र भामरे आणि जिल्हाधिकारी कार्यालय तसेच जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे, प्रसारमाध्यम प्रतिनिधी व नागरिकांचे जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप व जिल्हा माहिती कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी आभार मानले आहेत.

# भारतीय मजदूर संघाच्या उपाध्यक्षपदी सचिन मेंगाळे




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : वीज कंत्राटी कामगार,संघटित व असंघटीत क्षेत्रात कार्यरत सचिन मेंगाळे यांची भारतीय मजदूर संघाच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. सचिन मेंगाळे भारतीय मजदूर संघात 1997 पासून पुर्णकालीक म्हणून कार्यरत आहेत. विविध क्षेत्रातील कामगारांच्या समस्या, वेतन वाढ करार, आंदोलने व्दारे कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत आहेत. शिक्षण मास्टर ईन लेबर लॉ अँड लेबर वेलफेयर असे झाले आहे. भारतीय मजदूर संघाच्या प्रदेश बैठकी मध्ये प्रांत प्रभारी सी.वी. राजेश, प्रदेश अध्यक्ष ऍड.अनिल ढुमणे, महामंत्री किरण मिलगिर व संघटनमंत्री बाळासाहेब भुजबळ यांनी ही निवड घोषित केली.

आगामी काळ हा कंत्राटी कामगारांचाच आहे व अशा वेळी संघटित असंघटीत क्षेत्रात शोषित पीडित वंचित कांमगारांच्या हितार्थ शासन व प्रशासना विरोधात न्याया साठी सतत व प्रामाणिकपणे अथक संघर्ष करत असलेल्या सचिन मेंगाळे यांना भारतीय मजदूर संघाच्या प्रदेश उपाध्यक्ष पदाची जबाबदारी मिळणे हा दुग्धशर्करा योग असल्याचे मत वीज कंत्राटी कामगार संघाचे प्रदेश अध्यक्ष निलेश खरात महाराष्ट्र राज्यातील कंत्राटी कामगारांनी व्यक्त केले आहे. भारतीय मजदूर संघाच्या माध्यमातून सर्वसामान्य कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे असे मनोगत सचिन मेंगाळे यांनी व्यक्त केले आहे.

# देवेंद्र फडणवीस यांची अमेरिकेचे माईक हँकी यांनी घेतली भेट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**दावोस गुंतवणूक करार उद्योग संधीसाठी केले अभिनंदन**

मुंबई :- अमेरिकेचे भारतातील महावाणिज्यदूत माईक हँकी यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मेघदूत या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी श्री. हँकी यांनी दावोस येथील गुंतवणूक करारांच्या यशासाठी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचे अभिनंदन केले.

महाराष्ट्रात उद्योग उभारण्यासाठी अनेक अमेरिकन कंपन्या उत्सुक असल्याचे श्री. हँकी यांनी सांगितले. तसेच राज्यात ऊर्जा, नव तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा, नवनवीन क्षेत्रामधील सहयोगाबद्दल चर्चा केली.

राज्यात ऊर्जा क्षेत्रात असलेली संधी, विकास आणि पायाभूत सुविधा उभारणीमध्ये नवतंत्रज्ञानाचा वापर याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी उद्योग विभागाचे सचिव पी.अनबलगन, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारासु आदी उपस्थित होते.

# वैंकुठ म्हात्रेंच्या घरी माघी गणेशोत्सव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



डोंबिवली : भाद्रपद महिन्याप्रमाणे माघ महिन्यात सुद्धा गणेश उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो आज महिन्यामध्ये महागणपतीचा जन्म झाला म्हणून या घरी उत्सवाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागात सुद्धा मोठ्या प्रमाणात माघी सार्वजनिक आणि घरगुती गणपती उत्सव साजरा केला जातो. डोंबिवली शहरालगतच्या 27 गावांमधील सार्वजनिक आणि घरगुती गणपती उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो देसाई गावातील शिवसेना विभाग प्रमुख वैकुंठ म्हात्रे यांच्या निवासस्थाने माघी गणेशोत्सव करण्याची अनेक वर्षापासून ची प्रथा आहे यंदाच्या वर्षी सुद्धा त्यांनी माघी गणेश उत्सव सण मोठ्या उत्साहात साजरा केला. या गणेशोत्सवाच्या दर्शनाला मित्रमंडळी आप्तेष्ट नातेवाईक, तसेच कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश गोवर्धन मोरे साहेब महागणपतीचे दर्शन घेतले.

# स्पर्धेच्या युगात आत्मविश्वासाची खाण म्हणजे आई

## – पोलीस उपनिरीक्षक प्रियंका शेटे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




पारनेर : "आई येते महाविद्यालयात" कार्यक्रम उत्साहात पार पडला . निघोज - नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या निघोज येथील श्री मुलिकादेवी महाविद्यालयात "आई माझ्या महाविद्यालयात" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून नाशिक येथे कार्यरत व निघोज येथील मुलगी आणि सून असलेल्या पोलीस उपनिरीक्षक प्रियंका शेटे , रांजणगाव गणपती येथे कार्यरत असलेल्या पोलीस उपनिरीक्षक सविता काळे व पोलीस उपनिरीक्षक चित्रा घोडे , पत्रकार सौ . निलम खोसे पाटील उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना पोलीस उपनिरीक्षक प्रियंका शेटे म्हणाल्या की , आजच्या या स्पर्धेच्या धक्का धक्कीच्या , स्पर्धेच्या जगात आत्मविश्वासाची शिदोरी म्हणजे आई होय . मुलींनी आपले ध्येय ठरवून ते साध्य करण्यासाठी अथक परिश्रम घ्यावेत. स्पर्धा परीक्षेकडे सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा. ग्रामीण भागातील विद्यार्थिनींमध्ये अपार क्षमता असून, त्या कोणतेही ध्येय गाठू शकतात. फक्त योग्य दिशा आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज असल्याचे प्रतिपादन प्रियंका शेटे यांनी केले .

पोलीस उपनिरीक्षक सविता काळे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना सांगितले की, स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी मुलींनी स्वतःमध्ये बदल घडवणे गरजेचे आहे. आपल्या आयुष्याचे नियंत्रण सोशल मीडिया किंवा अन्य व्यसनांऐवजी योग्य दिशेने ठेवणे आवश्यक आहे. आपले कुटुंब आणि समाजाचे नाव उज्वल करण्यासाठी प्रयत्न करावेत.

पोलीस उपनिरीक्षक चित्रा घोडे यांनी स्वतःच्या जीवनातील संघर्षमय प्रवास उलगडून सांगितला. त्या म्हणाल्या, प्रत्येकाच्या आयुष्यात अडचणी असतात, परंतु योग्य विचारसरणी आणि सकारात्मक ऊर्जा यांच्या जोरावर कोणतीही अडचण दूर करता येते. मेहनतीला पर्याय नाही आणि यश मिळवण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक आहेत. असे ही घोडे म्हणाल्या .

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मार्गदर्शनात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सहदेव आहेर म्हणाले की , विद्यार्थिनींनी महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचा, वाचन कक्षाचा आणि अनुभवी प्राध्यापक वर्गाचा योग्य उपयोग करून स्वतःला घडवावे. अधिकाधिक ज्ञान मिळवून आपल्या भविष्यासाठी प्रयत्न करावेत. ग्रामीण भागातील विद्यार्थिनी कुठल्याही क्षेत्रात मागे नाहीत , त्यांच्यासाठी उज्वल संधी उपलब्ध आहेत.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित माता भारावून गेल्या. उपस्थित मान्यवर व आईंना विविध झाडांची रोपे देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच, काही मातांनी आणि विद्यार्थिनींनी प्रातिनिधिक स्वरूपात आपली मते व्यक्त केली.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हा सचिव सुरेश खोसे पाटील यांची पत्रकार संघाच्या राज्य कार्यकारिणी वर निवड झाल्याबद्दल प्राचार्य डॉ . सहदेव आहेर यांच्या हस्ते शाल , फुलांचा गुच्छ , एक रोपटे देऊन मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला . कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मनीषा गाडीलकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. नीलिमा घुले यांनी केले, तर प्रा. अमृता दौंडकर यांनी आभार मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापिका , विद्यार्थिनी व त्यांच्या आई मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# गोरक्षनाथ मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


कल्याण : कल्याण पूर्वेतील आमदार सौ सुलभाताई गणपत शेठ गायकवाड यांच्या निवासस्थानाच्या प्रांगणातअसलेले असलेले श्री गोरखनाथ मंदिरात च्या आवारात गोरक्षनाथ माऊली भजनी मंडळ अखंड हरिनाम सप्ताह व नवनाथ ग्रंथ पारायण हा धार्मिक कार्यक्रम आयोजित केला होता 3 फेब्रुवारी ते 6 फेब्रुवारी पर्यंत चार दिवस चालणारा हा सप्ताह आणि माघ महिन्याचा महागणपती उत्सव हा दुग्ध शर्करा योग जुळून आला.

सकाळी आठ वाजेपासून रात्री नऊ वाजेपर्यंत अनेक सुप्रसिद्ध ह भ प महाराज यांनी आपली सेवा प्रदान केली. 6 फेब्रुवारीला सकाळी नऊ ते अकरा वाजेपर्यंत ह भ प श्री संदीप महाराज डुंबरे (राजुरी-जुन्नर ) यांचे काल्याचे सुश्राय किर्तन होणार असून नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आव्हान आयोजकांकडून करण्यात आलेले आहे.

## टिटवाळा टेलिस्कोप मधून

# विद्यार्थ्यांनी अनुभवले आकाश दर्शन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : द सायन्स पॉईंट - ऍक्टिव्हिटी अड्डा टिटवाळा, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ठाणे, द यंग सायंटिस्ट डेन बदलापूर तर्फे घोटसई येथील सरस्वती विद्यालय प्रांगणात शनिवारी आकाशदर्शन करण्यात आले. व्हाट्सअप्प मधून मिळणाऱ्या अपुऱ्या (आणि बऱ्याचदा फसव्या) ज्ञानातून बाहेर पडून प्रत्यक्ष ग्राहगोल, तारे, नक्षत्र आणि राशी पाहताना मुलं आणि पालक सर्वांनाच विलोभनीय अनुभव आला. या अफाट विश्वात आपल्या पृथ्वीचं स्थान, आपली सूर्यमाला, आकाशगंगा आणि संपूर्ण विश्व यांची तुलनात्मक माहिती पाहताना अनेक विद्यार्थी आणि पालक आश्चर्यचकित झाले होते.

कार्यक्रमपूर्वी किशोर पाटील यांनी विद्यार्थ्यांना काही विज्ञानाचे चमत्कार दाखवले आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाची गरज सांगितली. आकाशदर्शनाची प्राथमिक माहिती दिल्यानंतर प्रत्यक्ष टेलिस्कोपमधून शनि, शुक्र ग्रह, गुरू आणि गुरुचे उपग्रह सुद्धा,चंद्राची कोर आणि लेसरच्या मदतीने अवकाशात असणारे तारकापुंज असा विश्वाचा अद्भुत नजारा पाहून विद्यार्थी आवाक् झाले होते.

विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी विचारलेल्या प्रश्नांची प्रकाश पारखे यांनी सोप्या आणि त्यांना समजेल अशा शब्दांत उत्तरे दिली. टिटवाळा आणि परिसरातील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी द सायन्स पॉईंट कडून नेहमीच असे वेगवेगळे वैज्ञानिक उपक्रम राबवले जातात. उपक्रमाला टिटवाळा शहर आणि परिसरातील विविध विद्यालयातील विद्यार्थी, पालक, द सायन्स पॉईंट ऍक्टिव्हिटी अड्डाचे किशोर पाटील, महा अंनिसचे पदाधिकारी किरण ईशी, सरस्वती विद्यालयाचे शिंगोळे , द यंग सायंटिस्टचे कार्यकर्ते यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ठाणे जिल्हा प्रधान सचिव डॉ. सुषमा बसवंत, यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी आरूष पाटील विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया दिली की, आमच्या विज्ञानाच्या पुस्तकात असंच दिलेलं आहे पण हे सर्व प्रत्यक्ष पाहताना खूपच मज्जा आली. मला नक्षत्र आणि तारकापुंज आता कायम लक्षात राहतील.

# मिठाईत सापडल्या अळ्या



कल्याण : कल्याण पश्चिमेतील यशवंतराव चव्हाण क्रीडांगणानजीक असलेल्या एका नामकिंत मिठाई च्या दुकानातून मिठाई विकत घेऊन ग्राहक घरी गेला असता त्या मिठाईत चक्क आळ्या आढळल्याचा खळबळजनक प्रकार उजेडात आला असून या प्रकरणी दक्ष ग्राहकाने कल्याणच्या महात्मा फुले स्टेशन मध्ये मिठाई दुकानदारा विरोधात तक्रार दाखल केली आहे.

सुत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार यशवंतराव चव्हाण क्रिडागण (मॅक्सी ग्राऊंड) चिकणघर परिसरानजीक असलेल्या एका नामकिंत मिठाई च्या दुकानातून काल सोनाली सुरेश भगत यांनी मिठाई घेऊन घरी गेल्या असता मिठाई चा बॉक्स् उघढला असता त्यात चक्क आळया आढळल्याने त्यांच्या कुटुंबियांचा मिठाई खाण्याचा रंग बेरंग झाला. या धक्कादायक प्रकारची दक्ष ग्राहक म्हणून दखल घेत या प्रकरणी महात्मा फुले पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करीत कारवाई ची मागणी केली.

याप्रकरणी महात्मा फुले पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर साबळे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, या प्रकरणी अवहाल अन्न औषधे ,भेसळ प्रतिबंधक विभाग ठाणे यांच्या कडे अवहाल पाठविणार असल्याचे सांगितले, .

# रिपाई सरचिटणीस पदी प्रा. शरदचंद्र सोनवणे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



मुरबाड : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले ठाणे जिल्हा ग्रामीणच्या वडपे भिवंडी येथील ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष संजय गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीमध्ये राष्ट्रीय सचिव तथा ठाणे प्रदेश निरीक्षक सुरेश बारशिंग,महाराष्ट्र राज्य सचिव बाळाराम गायकवाड, यांनी मुरबाड तालुक्यातील आंबेळे(बु) गावचे सुपुत्र प्रा. शरदचंद्र सोनावणे यांची ठाणे जिल्हा सरचिटणीस पदी निवड घोषित केली आहे.

यावेळी ठाणे प्रदेश अध्यक्ष अण्णासाहेब रोकडे, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष महबूब भाई पैठणकर,महाराष्ट्र राज्य सह सचिव . बाळकृष्ण गायकवाड, महाराष्ट्र युवक प्रदेश सरचिटणीस डॉ. विजय मोरे,महाराष्ट्र प्रदेश युवक आघाडीचे उपाध्यक्ष विनोद थोरात, युवक प्रदेश सह सचिव अमोल गायकवाड तसेच ठाणे जिल्हा बेसिकचे प्रमुख पदाधिकारी व महिला पदाधिकारी यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय सचिव सुरेश बारशिंग,महाराष्ट्र राज्य सचिव बाळाराम गायकवाड यांनी प्रा. शरदचंद्र सोनावणे यांची ठाणे जिल्ह्याच्या सरचिटणीस पदी निवड झाल्याचे घोषित केली व निवडीचे पत्रक राष्ट्रीय सचिव सुरेश बारशिंग व ठाणे प्रदेश अध्यक्ष अण्णासाहेब रोकडे यांनी प्रदान केले.

यावेळी ठाणे जिल्हा कार्याध्यक्ष अनिल धनगर,उपाध्यक्ष बी के गायकवाड,जयवंत सोनावणे, बाळासाहेब भालेराव,अरुण गायकवाड,गौतम झुमडे,प्रवीण गायकवाड,ठाणे जिल्हा महिला विभागीय अध्यक्ष संगीता गायकवाड,एडव्होकेट प्रतिभा कांबळे,शहापूर तालुका अध्यक्ष विजय वाढविंदे, सरचिटणीस बबन गायकवाड, भिवंडी तालुका अध्यक्ष भरत जाधव, सरचिटणीस नारायण जाधव,मुरबाड तालुका अध्यक्ष दिनेश उघडे, मुरबाड शहर अध्यक्ष कैलास देसले, किन्हवली विभागीय अध्यक्ष किशोर चणे,विजय वाढविंदे व शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'बांगलादेशी घुसखोर शोध मोहिम' राबवा

## – हिंदु जनजागृती समिती




देशभरात अनेक राज्यांत बांगलादेशी घुसखोरांचा अक्षरशः सुळसुळाट झाला आहे. यातून राज्याच्या सुरक्षेला मोठा गंभीर धोका निर्माण झाला असून सामाजिक अस्थिरता, गुन्हेगारी वाढ, रोजगाराची समस्या, तसेच खोट्या कागदपत्रांवर वास्तव्य करणाऱ्यांचे मोठे रॅकेट राज्यात सक्रिय असल्याचे दिसून येते. या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगाल, 'आसाम'सारखी संपूर्ण देशाची स्थिती होण्याआधी केंद्र आणि सर्व राज्य सरकारांनी देशभरात 'बांगलादेशी घुसखोर शोध मोहिम' राबवून सर्व बांगलादेशी घुसखोरांना शोधून काढावे, त्यांच्यावर कठोर कारवाई करावी आणि त्यांना देशाबाहेर हाकलावे, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीचे प्रवक्ता श्री. सतीश कोचरेकर यांनी केली आहे. ते मुंबई मराठी पत्रकार संघ येथे ३ फेब्रुवारी या दिवशी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. या दृष्टिने जनजागृतीसाठी संपूर्ण देशभरात आंदोलने, मोर्चे, स्वाक्षरी अभियान, पोलिस तक्रारी दाखल करणे असे नियोजन सुद्धा आम्ही करणार आहोत, हे श्री. कोचरेकर पुढे म्हणाले. यावेळी सनातन संस्थेचे प्रवक्ता श्री. अभय वर्तक, मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता राहुल पाटकर हे सुद्धा उपस्थित होते.

सनातन संस्थेचे प्रवक्ता श्री. अभय वर्तक म्हणाले, 'देशभरात अनेक शहरी भागांमध्येही शेकडो बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांना अटक झाली. मुंबई आणि नवी मुंबई मध्ये ८ ते १० लाखाहून अधिक बेकायदेशीर घुसखोर राहत असल्याचा अंदाज आहे. अशीच स्थिती देशभरात आहे. खरेतर ही आकडेवारी म्हणजे हिमनगाचे टोक आहे. बांगलादेशी घुसखोर ही समस्या देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर असून याची पाळेमुळे खणून काढणे अत्यावश्यक आहे. देशभरात 'बांगलादेशी घुसखोर शोध मोहिम' राबवावी; या अंतर्गत देशातील सर्वच जिल्हे, शहरे, तालुके येथील संशयित ठिकाणी 'सर्च ऑपरेशन'/'कोंम्बींग ऑपरेशन' राबवून बांगलादेशी घुसखोरांना शोधून काढावे; बनावट ओळखपत्रे तयार करणाऱ्या रॅकेटची पाळेमुळे उखडून त्यावर कठोर कारवाई करावी; भाड्याने खोली देण्याआधी घरमालकाने भाडेकरूंची, तसेच कामावर ठेवतांना कामगारांची योग्य ती चौकशी करावी, संशयास्पद आढळल्यास तत्काळ पोलिसांना कळवावे; घुसखोरांना आश्रय देणारे, जामीन देणारे किंवा कोणत्याही प्रकारचे साहाय्य करणारे यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, अशी आमची मागणी आहे. अभिनेता सैफ अली खान यांच्या निवासस्थानी घुसून हल्ला करणाऱ्या मोहम्मद शरीफुल इस्लाम शहजाद या बांगलादेशी घुसखोराला अटक करण्यात आली. तो बनावट नावाने मुंबईत वास्तव्य करत होता. देशातील अनेक समस्यांच्या मुळाशी बांगलादेशी घुसखोर आहेत. या दृष्टीने 'बांगलादेशी घुसखोर हाकला, देश वाचवा' ही मोहीम आम्ही सर्व हिंदू संघटना मिळून देशभर राबवणार आहोत. याला जनतेनीही साथ द्यावी असे आम्ही आवाहन करत आहोत. आम्ही देश घुसखोरमुक्त करून दाखवू.'

मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता राहुल पाटकर म्हणाले, 'बांगलादेशी घुसखोर देशातील रोजगार हिसकावून घेत आहे. महाराष्ट्रातील संभाजीनगरमधील सिल्लोडमध्ये एक लाखाहून अधिक बांगलादेशी घुसखोरांना बोगस प्रमाणपत्र वाटप करण्यात आल्याचा अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रत्नागिरीतील चिपळूण १३ बांगलादेशी नागरिकांपैकी ३ जणांनाच अटक करण्यात आली; त्यातही पोलिसांनी हे प्रकरण नीट न हाताळल्यामुळे बांगलादेशी घुसखोरांना जामीन मिळाला, ही अतिशय गंभीर बाब आहे. देशाची न्यायव्यवस्था बांगलादेशी घुसखोरांना जामीन देते, ही न्यायदेवतेची थट्टा आहे. 'सध्या बांगलादेशात अल्पसंख्यांक हिंदूंवर अनन्वित अत्याचार होत आहेत. उद्या हेच बांगलादेशी घुसखोर वाढत जाऊन भारतात छोटे बांगलादेश निर्माण करून तेथील हिंदूंवर असेच अत्याचार करतील, ही परिस्थिती येऊ द्यायची नसेल, तर या प्रकरणी सरकारने आताच कठोर पावले उचलायला हवीत', असे हिंदु जनजागृती समितीचे प्रवक्ता श्री. कोचरेकर शेवटी म्हणाले.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९१९०८२६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024